# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 28/03/2019 (गुरूवार)
# (सायंकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. रामटेक :– पो.स्टे. रामटेक दिनांक 09/09/2013 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. 3048/2013 कलम 354(अ),509 भादवी सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 06/09/2013 चे रात्रीचे पुर्वी आरोपी नामे नागेश जयराम बागडे, वय 35 वर्ष, रा. कवडक, दुधाळा याने फिर्यादीची 13 वर्षीय पिडीत मुलीला भांडे घासण्याच्या बहाण्याने घरी बोलवून मागील दार बंद करून खिश्यातील 100 रूपयाची नोट काढून आरोपीने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 13/10/2013 चे 21.45 वा. अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास सहा. फौजदार श्री. मधेकर झिंगरे पो स्टे रामटेक यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दि. 28/03/2019 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमान ए.के.शर्मा न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 376 (अ) भादंवि. मध्ये 6 महीने सश्रम कारावास व 500/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद, कलम 509 भादवि मध्ये 6 महीने सश्रम कारावास व 500/–रू दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद तसेच कलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 6 महीने सश्रम कारावास व 500/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी क़ैदे अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती गवळी, यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहा पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले, तर कर्मचारी सहा.फौज. श्री. अरूण भुरे, श्री. भवानीप्रसाद मिश्रा, राजेंद्र वानखेडे, पोशि श्री. ईश्वर यांनी मदत केली आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :- अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर चिचोली येथे दिनांक 21/03/2019 चे 16.30 वा. दरम्यान रविन्द्र शामराव मारवाडे, वय 33 वर्ष, चिचोली, ता. मौदा याने अज्ञात कारणातून राहत्या घरी विषारी औषध प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाल्याने त्याला शासकीय रूग्णालय भंडारा येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार फुडे, पो. स्टे. भंडारा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार तालेवार हे करीत आहे.

2) पो.स्टे. केळवद :- अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा केळवद, वार्ड क्र. 2 येथे दिनांक 16/03/2019 चे 12.00 वा. दरम्यान गजानन पांडुरंग ताजने, वय 34 वर्ष, केळवद याने अज्ञात कारणातून राहत्या घरी विषारी औषध प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाल्याने त्याला प्रथम शासकीय रूग्णालय केळवद व नंतर मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा वसंता निकोसे, मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर